# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

करोना व्हायरसमुळे मिस्साला न जाऊ शकणाऱ्यांसाठी घरी करावयाची प्रार्थना

**गुरूवार - १६ एप्रिल २०२०**

## स्वर्गाचे राणी

प्रमुख : स्वर्गाचे राणी, उल्हास कर

प्रतिसाद : आल्लेलुया

प्रमुख : कारण तू जन्म दिलेला प्रभू येशू ख्रिस्त

प्रतिसाद : आल्लेलुया

प्रमुख : आपल्या म्हणण्याप्रमाणे, उठला आहे

प्रतिसाद : आल्लेलुया

प्रमुख : आम्हासाठी देवाजवळ विनंती कर

प्रतिसाद : आल्लेलुया

प्रमुख : हे कुमारी मरिये, आनंद व उल्हास कर, आल्लेलुया

प्रतिसाद : कारण प्रभू खरोखर उठला आहे, आल्लेलुया

प्रमुख : आपण प्रार्थना करू या

सर्वजण : हे परमेश्वरा, तुझा पुत्र आमचा प्रभू येशू याच्या पुनरूत्थानाने तू सर्व जगाला आनंदित केलेस. त्याची माता धन्यवादित कुमारी मरिया हिच्या विनंतीमुळे आम्हाला अनंत जीवनाचा आनंद मिळावा अशी कृपा कर, ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

गायन : **प्रसन्नतेने ... गीत क्र. १५**

कुटुंब प्रमुख : पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा यांच्या नावे

सर्व : आमेन.

कुटुंब प्रमुख : परमेश्वर आपले घर आणि हृदय विपुल शांतीने भरीत असतो. आपण त्याची आराधना करू या. परमेश्वर सदैव सुवंदित असो.

सर्व : परमेश्वर सदैव सुवंदित असो.

## पश्चाताप विधी

कुटुंब प्रमुख ः प्रिय कुटुंबियांनो, या प्रार्थना विधीत सहभागी होण्यास आपण पात्र ठरावे म्हणून आपण आपल्या पापांची आठवण करू या व ईश्वराकडे विश्वासाने क्षमा मागू या .

कुटुंब प्रमुख ः हे प्रभो येशू, परमेश्वराच्या राज्यात लोकांना शांतीने एकत्रित करण्यासाठी तू आलास . हे प्रभो, आम्हावर दया कर .

सर्व ः हे प्रभो, आम्हावर दया कर .

कुटुंब प्रमुख ः आमचे पावित्र्य वाढविण्यासाठी तू शब्द व संस्काराररूपाने येतोस . हे ख्रिस्ता, आम्हावर दया कर .

सर्व ः हे ख्रिस्ता, आम्हावर दया कर .

कुटुंब प्रमुख ः तुझ्या लोकांना मुक्ती देण्यासाठी तू वैभवाने पुन्हा येणार आहेस . हे प्रभो, आम्हावर दया कर .

सर्व ः हे प्रभो, आम्हावर दया कर .

कुटुंब प्रमुख ः सर्वसमर्थ परमेश्वर आम्हांवर दया करो व आमच्या पापांची क्षमा करून आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो .

सर्व ः आमेन .

## आपण प्रार्थना करू या ः

हे सर्वसमर्थ बापा, तुझ्या नावाचा गौरव गाण्यासाठी तू लोकांना एकत्र केलेस . स्नानसंस्काराद्वारे नवजन्म घेतलेल्या सर्वांना श्रद्धेच्या व प्रीतीच्या बंधनाने एकत्र ठेव . ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहाणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो .

सर्व ः आमेन .

## प्रभूशब्दविधी

**पहिले वाचन ः** **प्रेषितांची कृत्ये ३ ः ११ २६**

**वाचक** ः पेषितांची कृत्ये ह्या पुस्तकामधून घेतलेले वाचन ः

तो मनुष्य पेत्र व योहान ह्यांना बिलगून राहिला असता सर्व लोक आश्चर्यचकित होऊन त्यांच्याकडे शलमोनची देवडी नावाच्या ठिकाणी धावत आले . हे पाहून पेत्राने लोकांस म्हटले, “अहो इसरायल लोकांनो, ह्याचे आश्चर्य का करता? आपल्या सामर्थ्याने किंवा सुभक्तीने ह्याला चालावयास लावले आहे असे समजून आम्हांकडे निरखून

का पाहता? आब्राहाम, इसहाक व याकोब ह्यांचा देव, आपल्या पूर्वजांचा देव, ह्याने आपला सेवक येशू याला गौरविले आहे. त्याला तुम्ही धरले आणि पिलाताने त्याला सोडून देण्याचा निश्चय केला असताही त्याच्यासमक्ष तुम्ही त्याला नाकारले. जो पवित्र आणि नीतिमान त्याला तुम्ही नाकारले व खुनी पुरूष आम्हास द्या अशी मागणी केली आणि तुम्ही जीवनाच्या अधिपतीला जिवे मारले. मग देवाने त्याला मेलेल्यांमधून उठवले ह्याचे आम्ही साक्षी आहो. त्याच्याच नावावरील विश्वासामुळे त्या नावाने ह्या ज्या माणसाला तुम्ही पाहता व ओळखता त्याला शक्तीमान केले आहे. येशूच्याद्वारे असलेल्या विश्वासाने ह्याला तुम्हा सर्वांसमक्ष ही शरीरसंपत्ती प्राप्त झाली आहे."

"बंधुजनहो, आता तुम्ही तसेच तुमच्या अधिका-यांनीही, जे केले ते अज्ञानामुळे केले हे मी जाणून आहे. परंतु देवाने, आपल्या ख्रिस्ताने, दुःख सहन करावे असे जे सर्व संदेष्टयांच्या मुखाने पूर्वी सांगितले होते ते त्याने त्याप्रमाणे पूर्ण केले. तेव्हा तुमची पापे पुसून टाकली जावी म्हणून पश्चाताप करा व वळा, अशासाठी की, विश्रांतीचे समय प्रभूजवळून यावे आणि तुम्हांकरिता पूर्वी नेमलेला ख्रिस्त येशू ह्याला त्याने पाठवावे. सर्व गोष्टी पूर्वस्थितीला पोहोचण्याच्या ज्या काळाविषयी देवाने आरंभापासून आपल्या पवित्र संदेष्टयांच्या मुखाने सांगितले त्या कालापर्यंत येशूला स्वर्गात राहणे प्राप्त आहे. मोशेनेही म्हटलेच आहे, प्रभू देव तुम्हांसाठी माझ्यासारखा संदेष्टा तुमच्या बांधवामधून उभा करील. तो जे काही तुम्हांला सांगेल त्याप्रमाणे सर्व गोष्टींत त्याचे ऐका आणि असे होईल की, जो कोणी त्या संदेष्टयाचे ऐकणार नाही तो लोकातून अगदी नष्ट केला जाईल. आणखी शमुवेलपासून परंपरेने जितके संदेष्टे बोलले तितक्या सर्वांनी ह्या दिवसाविषयी सांगितले. तुम्ही संदेष्टयांचे पुत्र आहा आणि तुझ्या संततीच्या द्वारे पृथ्वीतील सर्व कुळे आशीर्वादीत होतील असे अब्राहामशी बोलून देवाने तुमच्या पूर्वजांबरोबर केलेल्या कराराचेही तुम्ही पुत्र आहा. देवाने आपल्या सेवकाला उठवून प्रथम तुम्हांकडे पाठवले ह्यासाठी की त्याने तुम्हा प्रत्येकाला तुमच्या दुष्कृत्यांपासून वळून जाण्याचा आशीर्वाद द्यावा.

हा प्रभूचा शब्द आहे.

सर्व ः देवाला धन्यवाद.

**प्रतिसाद स्तोत्र ः** **स्तोत्र ८ः २, ५ - ९**

प्रतिसाद ः हे प्रभू, तुझे नाम कितीतरी थोर आहे!

१. हे प्रभो, आमच्या स्वामी,
सा-या भूतलावर तुझे नाम कितीतरी थोर आहे!
तू मर्त्य माणसांची आठवण करावी,
यःत्किश्चित मानवजातीची तू पर्वा करावी,
असा तो कोण?

प्रतिसाद ः हे प्रभू, तुझे नाम कितीतरी थोर आहे!

२. तरीपण देवापेक्षा तू त्याला किंचित कनिष्ठ केले आहे
त्याला वैभव व मोठेपणा यांनी अलंकृत केले आहेस,
आपल्या हातच्या कलाकृतीवर तू त्याला
स्वामित्व दिले आहेस,
सारे काही त्याच्या चरणापाशी ठेवले आहेस.

प्रतिसाद : हे प्रभू, तुझे नाम कितीतरी थोर आहे!

३. शेरडेमेंढरे, गुरेढोरे अगदी एकूणएक जंगली जनावरे,
आकाशातील पाखरे, समुद्रातील मासे,
सागरात संचार करणारे प्राणी देखील
तू त्याच्या चरणापाशी ठेवले आहेत.

प्रतिसाद : हे प्रभू, तुझे नाम कितीतरी थोर आहे!

## शुभवर्तमान जयघोष

आलेलुया, आलेलुया!
प्रभूचा हा दिवस आहे,
ह्या दिवशी आपण उल्हास व आनंद करू या,
आलेलुया!

## शुभवर्तमान : लूक २४ : ३५ - ४८

वाचक : लूकच्या शुभवर्तमानातून घेतलेले वाचन.

सर्व : हे प्रभो, तुझा गौरव असो.

प्रेषितांना वाटेतल्या घटना आणि येशूने भाकर मोडली तेव्हा आपण त्याला कसे ओळखले हे निवेदन केले. ते ह्या गोष्टी सांगत असता येशू स्वतः त्यांच्यामध्ये उभा राहिला आणि त्यांस म्हणाला, “तुम्हांस शांती असो!” पण ते घाबरून भयभीत झाले आणि भूत पाहत आहोत असे त्यांस वाटले. त्याने त्यांस म्हटले, “तुम्ही का घाबरता आणि तुमच्या मनात तर्कवितर्क का उद्‌भवतात? माझे हात आणि माझे पाय पाहा, मीच तो आहे, मला चाचपून पाहा, जसे मला हाडमांस असलेले पाहता तसे भूताला नसते,” असे बोलून त्याने त्यांस आपले हातपाय दाखवले. मग आनंदामुळे त्यांस ते खरे न वाटून ते आश्चर्य करीत असता त्याने त्यांस म्हटले, “येथे तुम्हाजवळ खाण्यास काही आहे काय?” मग त्यांनी त्याला भाजलेल्या पावाचा तुकडा दिला तो घेऊन त्याने त्यांच्यादेखत खाल्ला.

मग तो त्यांस म्हणाला, “मी तुमच्याबरोबर असताना तुम्हाला सांगितलेली माझी वचने हीच आहेत की, मोशेचे नियमशास्त्र, संदेष्टे व स्तोत्रे ह्यात माझ्याविषयी जे लिहिलेले आहे ते सर्व पूर्ण होणे आवश्यक आहे.” तेव्हा त्यांना शास्त्र समजावे म्हणून त्याने त्यांचे मन उघडले आणि त्यांस म्हटले, “असे लिहिले आहे की, ख्रिस्ताने दुःख सोसावे, तिस-या दिवशी मेलेल्यांतून उठावे आणि येरूशलेमपासून आरंभ करून सर्व राष्ट्रांस त्याच्या नावाने पश्चाताप व पापक्षमा घोषित करण्यात यावी. तुम्ही ह्या गोष्टींचे साक्षी आहा.”

प्रभूचे हे शुभवर्तमान.

सर्व ः हे ख्रिस्ता, तुझी स्तुती असो.

**चिंतन** ः प्रभू येशूच्या दुःखसहनात खलनायक अनेक असले तरी नायक एकच होता, परमेश्वर पिता. सर्व काही त्याच्या इच्छेप्रमाणे होत होते. ही फार मोठी दैवी योजना होती. ती यहुदी लोकांच्या लक्षात आली नाही कराण त्यांच्या अंतःकरणाचे दरवाजे बंद झाले होते. शिष्यांचेही तसेच झाले होते. परंतु आजच्या शुभवर्तमानात आपण ऐकतो त्याप्रमाणे त्यांना शास्त्र समजावे म्हणून येशूने त्यांचे मन उघडले व त्यांना शास्त्राचे ज्ञान दिले. त्यामुळे आज आपण पहिल्या वाचनात पेत्र किती सुलभतेने शास्त्र लोकांना समजावून देत आहे हे ऐकतो. फारसे ज्ञान नसलेल्या पेत्रासारख्या माणसाच्या तोंडातून शास्त्राचा उलगडा हे पवित्र आत्म्याचे दान होते. प्रभू येशूचा आत्मा आपले मन उघडत असतो व केवळ बुद्धीने समजणार नाही असे शास्त्राचे ज्ञान आपल्याला देत असतो.

थोडावेळ शांत राहून आपण चिंतन करू या.

**आपण प्रार्थना करू याः**

हे सर्वसमर्थ बापा, आमच्या प्रार्थनेचा तू स्वीकार कर. स्नानसंस्काराद्वारे नवजीवन प्राप्त झालेल्या सर्वांना नेहमी सुरक्षित ठेव. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

सर्वः आमेन.

**प्रभूची प्रार्थना**

कुटुंब प्रमुख ः प्रभू येशूच्या शब्दांत आपण परमेश्वर पित्याकडे आत्मविश्वासाने प्रार्थना करू याः

सर्व ः आमच्या स्वर्गीय बापा। तुझे नाव पवित्र मानले जावो। तुझे राज्य येवो। जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही। तुझ्या इच्छेप्रमाणे होवो। आमची दररोजची भाकर। आज आम्हाला दे। जशी आम्ही। आमच्या अपराध करणाऱ्यांना क्षमा करतो। तशी तू आमच्या अपराधांची। क्षमा कर। आणि आम्हाला। मोहात पडू देऊ नकोस। पण वाईटापासून। आम्हाला सोडव. आमेन.

**शांतीवंदना ः**

कुटुंब प्रमुख ः हे प्रभो, सर्व वाईटांपासून आमचे संरक्षण कर. या जीवनात तू आम्हाला शांती दे. आमच्या तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या पुन्हा येण्याची व शाश्वत जीवनाची आशेने वाट पहात असताना आम्ही तुझ्या दयेच्या साहाय्याने पापांपासून दूर राहावे व सर्व संकटापासून सुरक्षित असावे.

सर्व ः कारण राज्य, अधिकार व गौरव सदासर्वदा तुझाच आहे.

कुटुंब प्रमुख ः हे प्रभो येशू ख्रिस्ता, तू आपल्या प्रेषितांस म्हणालास, "मी तुम्हांसाठी शांती राखून ठेवली आहे. मी माझी शांती तुम्हास देतो". म्हणून आमच्या पापांकडे पाहू नकोस तर तुझ्या ख्रिस्तसभेच्या श्रद्धेकडे पहा आणि आम्हाला तुझ्या स्वर्गीय राज्यातील शांती व ऐक्य देण्याची कृपा कर. तू नित्यजिवी असून सदासर्वदा राज्य करतोस.

सर्व ः आमेन

कुटुंब प्रमुख ः प्रभूची शांती आपल्या बरोबर सदा असो.

सर्व ः आणि तुम्हाबरोबर सुद्धा.

कुटुंब प्रमुख ः आपण एकमेकांस शांतीवंदन करू या.

**आपण प्रार्थना करू या ः**

हे प्रभो, आमच्या तारणाचा हा दिव्य उत्सव आमच्या ऐहिक जीवनास सहायक ठरो व आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

सर्व ः आमेन.

**समारोपविधी**

कुटुंब प्रमुख ः प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

सर्व ः आमेन.

कुटुंब प्रमुख ः आपण सर्व ख्रिस्ताच्या शांतीत जाऊ या, आलेलुया आलेलुया.

सर्व ः देवाचे आभार मानू या, आलेलुया आलेलुया.

## कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रार्थना

सर्वसमर्थ व दयावंत परमेश्वरा, सर्व जगाला तू तुझे प्रेम सदैव व सर्वत्र दाखवत असतोस .

कोरोना विषाणुची झळ पोहोचलेल्या ह्या विश्वाच्या विविध भागातील लोकांसाठी आम्ही करीत असलेली प्रार्थना दयेने ऐक .

या रोगाच्या संसर्गामुळे निर्माण झालेली परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी, ह्या आजाराने पछाडलेल्या व्यक्तींना व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्यदायी स्पर्श लाभण्यासाठी आम्ही तुझ्याकडे कळकळीने याचना करतो .

डॉक्टर्स, नर्सेस व सेवकवर्ग संबंधितांची काळजी घेत आहेत, सेवा पुरवित आहेत, त्यांना ह्या संसर्गापासून सुरक्षित ठेव आणि ह्यापुढेदेखील कार्य करण्यासाठी त्यांना तुझी वृत्ती व पवृत्ती लाभावी म्हणून आम्ही प्रार्थना करतो .

ह्या आजारावर मात करण्याकरिता लवकरात लवकर प्रभावी उपाय शोधता यावा म्हणून संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांसाठी आम्ही तुझी करूणा भाकतो .

लोकांच्या हितासाठी झटणाऱ्या सरकारी व आरोग्य यंत्रणांना ह्या आजारावर मात करण्यासाठी योग्य पावले उचलता यावीत म्हणून आम्ही प्रार्थना करतो .

ही प्रार्थना आम्ही प्रभूख्रिस्ताद्वारे करतो . आमेन .

गायन ः ख्रिस्त आज विजयी झाला ….. गीत कमांक ः वसुंधरे गा २७६